स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कला शाखांतर्गत पीएच. डी. (मराठी) पदवीकरिता सादर करण्यात येणा–या प्रबंधाचा आराखडा

महाराष्ट्रातील मराठीच्या शालेय पाठ्यपुस्तकातील विचारप्रणाली आणि प्रभुत्व : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक

रेणुकादास काशीराम उबाळे

मार्गदर्शक

प्राचार्यडॉ. आनंद भंडारे

मराठी विभाग,

सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालय,

किनवट, जि. नांदेड

जुलै2019

महाराष्ट्रातील मराठीच्या शालेय पाठ्यपुस्तकातील विचारप्रणाली आणि प्रभुत्व : एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :

'शिक्षण' हा मानवी जीवनातील महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणाचे औपचारिक व अनौपचारिक असे दोन मुख्य प्रकार असले तरी प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीमध्ये औपचारिक शिक्षणाचा महत्त्वाचा वाटा असतो. प्राचीन कालखंडापासून भारतीय शिक्षणाला एक प्रदीर्घ आणि विशिष्ट असा इतिहास आहे. आधुनिक काळात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अधिकृतपणे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यात आले व व्यापक स्तरावरून शिक्षण ही बाब सर्व समाज घटकांसाठी उपलब्ध होऊ लागली. भारतीय राज्यघटनेनुसार सरकारने प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक अशा सर्वांगीण उत्थानाकरिता प्रतिबद्धता बाळगणे अनिवार्य आहे. देशात जन्मलेल्या प्रत्येक मुलाला दर्जाची आणि संधीची समानता मिळवून देण्याची ग्वाही भारतीय संविधान आपल्या प्रास्ताविकेतूनच देते. ही दर्जाची आणि संधीची समानता मिळविण्याचे आत्यंतिक महत्त्वाचे व एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. म्हणून शिक्षणाचा मानवी जीवनाशी अतूट संबंध असतो.

महाराष्ट्रातील शालेय स्तरावरील अनेक विषयांपैकी मराठी हा एक महत्त्वाचा विषय आहे. मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा व बहुतांश विद्यार्थ्यांची मातृभाषा असल्याने अभ्यासक्रमातील तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतातीलच नव्हे तर जगभरातील शिक्षणतज्ज्ञांनी अभ्यासक्रमातील मातृभाषेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. माणसाला कोणतेही मूलभूत ज्ञान त्याच्या मातृभाषेतूनच उत्तम प्रकारे समजून घेता येते, हे देखील सिद्ध झाले आहे. त्यामुळे त्याच्या मातृभाषेची जाण अत्यावश्यक मानली जाते. कोणत्याही भाषेचे शिक्षण हे प्रामुख्याने दोन अंगांनी दिले जाते. (1) भाषा म्हणून तिचे व्यावहारिक शिक्षण (अक्षर ओळख, वाचन, लेखन, भाषेची रचना, विनियोग इ.) (2) भाषेतील सृजनात्मक साहित्य (जसे कथा, कविता, नाटक, संवाद इ. लेखनप्रकार) यातील भाषेच्या व्यावहारिक अभ्यासातून विद्यार्थ्यांची व्यावहारिक भाषिक क्षमता विकसित होते तर

भाषेच्या साहित्यिक परिचयातून विद्यार्थ्यांचा भावनिक, वैचारिक व बौद्धिक विकास होतो. भाषा आणि साहित्य यांच्या अध्ययन–अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या मनावर विशिष्ट मूल्यसंस्कार होण्यास मदत होते व त्याचा भावनिक विकास उत्तम प्रकारे होतो. म्हणूनच शालेय पातळीवर कोणत्या प्रकारचा भाषिक व साहित्यिक अभ्यासक्रम आहे यावरून विद्यार्थ्यांच्या धारणा, समजूती, विचार, संस्कार इ. बाबी घडविल्या जातात. वयाच्या विशिष्ट काळातच विद्यार्थ्यांवर उदात्त मानवी मूल्यांचे संस्कार करण्यासाठी अभ्यासक्रम महत्त्वाचे ठरत असतात.

पार्श्वभूमी :

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा समिती (National Curriculum Framwork) ने अभ्यासक्रमासंबंधी काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. नव्हे, कुठल्याही अभ्यासक्रमाच्या रचनेच्या त्या पूर्वअटीच आहेत. यामध्ये प्रामुख्याने धर्मनिरपेक्षता, स्त्री–पुरूष समानता, विज्ञाननिष्ठा, भेदभावरहित संस्कार इ. बाबींचे नियमन अभ्यासक्रमातून होणे बंधनकारक असते. थोडक्यात, भारतीय राज्यघटनेला जी मूल्ये प्रवर्धित करावयाची आहेत, त्याला अनुरूप असा अभ्यासक्रम व पाठयक्रम अपेक्षित असतो. याच सर्व निकषांवर अभ्यासक्रमाची चिकित्सा करणे आवश्यक असते. परंतु ब–याचदा अभ्यासक्रमामध्ये प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष धार्मिक मूल्यांचा अंर्तभाव होतांना दिसून येतो. भारतामध्ये इ. स. 1991 च्या सुमारास खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला गेला. याच काळात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक आर्थिक व राजकीय बदल झाले. याचा दुरगामी परिणाम भारतातील शासकीय धोरणांवर झाला. गेल्या काही वर्षांपासून शासनाने खाजगीकरणाचा मोठया प्रमाणावर पुरस्कार केला आहे. शिक्षण क्षेत्रातही खाजगीकरणाचा शिरकाव झाला आहे. परिणामी शाळांचे स्तरीकरण वाढले आहे. या काळात शिक्षणाचे 'क्रयवस्तू' मध्ये झाले. तसेच अभ्यासक्रमातूनही बाजारी भांडवली मूल्य नकळतपणे जोपासले गेले. रूपांतर याच काळात शिक्षण व्यवस्थेची रचना, माध्यम, अभ्यासक्रम अशा सर्वच घटकांमध्ये स्थित्यंतर झाल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत मराठीच्या अभ्यासक्रमाची कशी वाताहत झाली हे पाहणे आवश्यक ठरते. अशा सर्व घडामोडींमध्ये मराठीच्या

अभ्यासक्रमात कोणते मूलभूत बदल झाले ? त्या बदलांच्या प्रेरणा कोणत्या ? त्यांचे स्वरूप व परिणाम कोणते आहेत ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधणे क्रमप्राप्त ठरते.

विषय निवडीमागील भूमिका :

मराठी या मातृभाषेची संस्कारक्षमता लक्षात घेऊन सदरील विषयाची निवड करण्यात आली आहे. शालेय पातळीवरील विद्यार्थ्यांचे वय हे संस्कारक्षम असते. याच काळात विद्यार्थ्यांच्या आंतरिक जाणिवेचा (Inner Consciousness) विकास होत असतो. अशा काळात शालेय पाठयपुस्तके मूल्यसंस्काराची महत्त्वाची भूमिका बजावीत असतात. कोणत्याही विद्यार्थ्यांच्या किंवा व्यक्तीच्या स्मृतीपटलावर शालेय पाठयपुस्तके दीर्घकाळ प्रभाव गाजवत असतात. म्हणून पाठयपुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर नेमके कोणते मूल्यसंस्कार होतात हे महत्त्वाचे ठरते.

शिक्षण व्यवस्थेचे अस्तित्व हे स्वतंत्र व स्वयंभू कधीच नसते. व्यवस्थेचा एक भाग किंवा उपांग म्हणून ती कार्यरत असते. त्यामुळे शिक्षणाची रचना, आशय, अभ्यासक्रम, पाठयक्रम हे घटकसुद्धा प्रस्थापित व्यवस्थेला पोषक आणि पूरक ठरावेत, असे घडविले जातात. कृष्णकुमार यांच्या मते, 'वर्गावर्गात होणा–या शिक्षणावर राज्य सरकारांना नियंत्रण ठेवता यावे यासाठीचे एकमात्र साधन म्हणजे पाठयपुस्तक होय.' अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रचलित समाजव्यवस्थेची विचारप्रणाली नव्या पिढीवर सहजपणे लादता येते. प्रस्थापित व्यवस्थेला पोषक मानस घडविणे शिक्षणाच्या माध्यमातून सहज शक्य होते. म्हणूनच समाजामध्ये प्रचलित असणा–या धारणा व मूल्ये अभ्यासक्रमातही पाझरताना दिसतात.

ब–याचदा व्यवस्थेच्या व्यापक जाणीव–नेणिवेचा पगडासुद्धा अभ्यासक्रमाच्या रचनेवर असलेला जाणवतो. परंतु व्यवस्थेची वस्तुनिष्ठ चिकित्सा व परिवर्तनाचा आशावाद या बाबींचा येथे अभाव दिसून येतो. वर्तनप्रक्रियेमध्ये बदल हा शिक्षणाचा मुख्य हेतू अभ्यासक्रमातून साधला जातो का ? हा प्रश्न पडतो. कारण शिक्षण घेतल्यावरही जातीव्यवस्था, वर्गव्यवस्था, लिंगभेद यासंबंधीचे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर तसेच

कायम राहिल्याचे दिसून येते. म्हणून समाजामध्ये रूढ असणा—या विचारप्रणालीचे अथवा धारणांचे पडसाद अभ्यासक्रमावर कसे पडतात ? या प्रामाणिक जिज्ञासेतून सदरील संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

संषोधन विषयाचे महत्त्व :

सदरील संशोधन विषय केवळ ठराविक काळातील मराठी विषयाच्या अभ्यासक्रमासंबंधी असला तरी निरनिराळया सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक वातावरणाप्रमाणे शालेय अभ्यासक्रम हे कसे बदलतात, याचा वेध या अभ्यासातून घेता येईल. प्रस्थापित समाज, त्याची रचना, प्रस्थापित धारणा यांचा अभ्यास करून अभ्यासक्रमातील प्रभावाचा शोध या विषयाच्या माध्यमातून घेता येतो. तसेच अभ्यासक्रम निश्चितीमागे कोणकोणत्या प्रेरणा कार्यरत असतात, याचाही शोध या माध्यमातून घेता येतो. निरनिराळया परिस्थितीत अभ्यासक्रमाच्या रचनेची विविधता म्हणजे समाजातील स्थित्यंतराचे निदर्शक असते. त्यामुळे हा अभ्यास म्हणजे एका अर्थाने सामाजिक स्थित्यंतराचा अभ्यासही ठरतो. या निमित्ताने समाजाच्या व्यापक सामाजिक, सांस्कृतिक मानसिकतेचाही वेध घेता येतो. म्हणूनच हा अभ्यास म्हणजे समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक मूल्यांचे प्रमाण ठरतो.

संषोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा :

सदरील संशोधनाचे शीर्षक ''महाराष्ट्रातील मराठीच्या शालेय पाठ्यपुस्तकातील विचारप्रणाली आणि प्रभुत्व : एक चिकित्सक अभ्यास'' असे असून या संशोधन विषयाला काही मर्यादा आहेत. प्रस्तुत संशोधन हे केवळ महाराष्ट्रातील मराठी विषयाच्या अभ्यासक्रमापुरते मर्यादित आहे. तसेच हा अभ्यास केवळ 2010 ते 2020 (म्हणजेच शैक्षणिक सत्र 2010–11 ते 2019–20) या कालखंडापुरताच मर्यादित असणार आहे. शिवाय शालेय पातळीवरील केवळ प्राथमिक स्तरावरील State Board, CBSE, ICSE आकृतीबंधातील किंवा अभ्यासक्रम मंडळांतील मराठीच्या पाठयपुस्तकांचाच हा अभ्यास असेल.

संषोधनाची उद्दिष्ट्ये :

1) शालेय पातळीवरील मराठीच्या अभ्यासक्रमाच्या स्वरूपाचा शोध घेणे.

2) शालेय मराठीच्या अभ्यासक्रमातील विचारप्रणालींच्या प्रभूत्वाचा शोध घेणे.

3) विविध आकृतीबंधातील किंवा अभ्यासक्रम मंडळांतील (CBSE, ICSE, State Board) मराठीच्या अभ्यासक्रमाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

4) मराठीच्या अभ्यासक्रमातील वाटचालीचा व स्थित्यंतराचा शोध घेणे.

5) मराठीच्या अभ्यासक्रमातील मानवी मूल्ये, तत्त्व आणि विचार याचा धांडोळा घेणे.

6) मराठीच्या अभ्यासक्रमावरील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक प्रभाव तपासणे.

7) मराठीच्याअभ्यासक्रमातील लिंगभाव व धार्मिक मूल्यांचा शोध घेणे.

8) सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय बदलती परिस्थिती व मराठीचा अभ्यासक्रम यांचा अनुबंध लावणे.

9) 2009 ते 2020 या कालखंडातील मराठीच्या अभ्यासक्रमातील बदलांची कार्यकारण भावाने संगती लावणे.

10) मराठीच्या अभ्यासक्रमाची आदर्शवत चौकट पडताळून सद्यकालीन मराठीच्या अभ्यासक्रमाची चिकित्सा करणे.

संषोधनाची गृहितके :

1) मराठी विषयाचा अभ्यासक्रम कालखंडानुसार व बदलत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीनुसार बदलतो.

2) कोणत्याही अभ्यासक्रमाचा आशय हा ठराविक आयोग आणि समित्यांच्या शिफारशींचा परिपाक असतो.

3) मराठीच्या अभ्यासक्रमावर प्रस्थापित धारणा, मूल्ये व विचार यांचा प्रभाव असतो.

4) मराठी विषयाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांची मानसिकता, नेणीव, सहजभाव व विचार करण्याची पद्धत यावर प्रभाव टाकत असतो.

5) मराठीच्या अभ्यासक्रमामुळे वैचारिक व नैतिक मानवी मूल्ये, विकसित होतात.

संषोधन पद्धती :

सदरील संशोधन पूर्ण करण्यासाठी समीक्षा पद्धती, वर्णनात्मक संशोधन पद्धती, ऐतिहासिक संशोधन पद्धती, वाचन पद्धती, सर्वेक्षण पद्धती, नमुना निवड पद्धती, मुलाखत पद्धती अशा विविध संशोधन पद्धतींचा वापर करण्यात येईल. तसेच प्रसंगानुरूप व गरजेनुसार आवश्यक वाटणा–या विविध संशोधन पद्धतींचा वापर करण्यात येईल.

प्रकरणांची रचना :

- **प्रकरण पहिले**– शिक्षण, अभ्यासक्रम, पाठयक्रम, विचारप्रणाली, प्रभुत्त्व : संकल्पना आणि स्वरूप.
- **प्रकरण दुसरे**– अभ्यासक्रम रचनेचा ऐतिहासिक व धोरणात्मक आढावा.
- **प्रकरण तिसरे**– मराठीच्या पाठयक्रम संहितेचा आढावा. (भाषिक, साहित्यिक व सामाजिक)
- **प्रकरण चौथे**– शालेय अभ्यासक्रमातील मराठी विषयातील आशय.
- **प्रकरण पाचवे**– मराठीच्या अध्ययन–अध्यापन पद्धतीचे वास्तव : चिकित्सा व अपेक्षा.
- **प्रकरण सहावे**– मराठीच्या अभ्यासक्रमाची फलनिष्पत्ती. (सहजभाव, विचार, धारणा, मूल्य, जीवनशैली, वर्तन व्यवहार)
- **उपसंहार व निष्कर्ष**
- **परिषिष्ट्ये**
- **संदर्भ व टीपा**

संदर्भ :

1- महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास –*श्री. पां. श्री. आपटे*, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

2- शिक्षण : प्राचीन आणि अर्वाचीन –*कृष्णराव हनुवते*, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.

3- प्राथमिक शिक्षणाचे वास्तव –*प्रभाकर आरडे*, आरडंट प्रकाशन, कोल्हापूर.

4- महाराष्ट्रातील शिक्षणाचा विकास – महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

5- द्वि–वर्ण शिक्षण व्यवस्था –*कॉ. गोविंद पानसरे*, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मुंबई.

6- शिक्षणाचे ब्राम्हणीकरण –*अंकुश कदम*, महाकवी अश्वघोष प्रकाशन, सिंधुदुर्ग.

7- पाठयपुस्तके आणि लिंगभाव : विश्लेषक चिकित्सा, संपादक *निर्मला जाधव*, हरिती प्रकाशन, पुणे.

8- शिक्षण – संपादक *प्रा. विलास रणसुभे*, लोकवाङ्मयगृह, मुंबई.

9- सांस्कृतिक साम्राज्यवाद और शिक्षक –*मार्टीन कारनॉय,* अनुवादक कृष्णकांत मिश्र, ग्रंथशिल्पी प्रकाशन, दिल्ली.

10- शैक्षिक ज्ञान और वर्चस्व –*कृष्णकुमार*, ग्रंथशिल्पी प्रकाशन, दिल्ली.

11- शिक्षा और ज्ञान –*कृष्णकुमार*, ग्रंथशिल्पी प्रकाशन, दिल्ली.

12- शिक्षा में बदलाव का सवाल –*डॉ. अनिल सदगोपाल*, ग्रंथशिल्पी प्रकाशन, दिल्ली.

13- रवींद्रनाथ का शिक्षा दर्शन – अनुवादक *गोपाल प्रधान*, ग्रंथशिल्पी प्रकाशन, दिल्ली.

14- उत्पीडितों का शिक्षा शास्त्र –*पाऊलो फ्रेरे*, अनुवादक रमेश उपाध्याय, ग्रंथशिल्पी प्रकाशन, दिल्ली.

संशोधक

रेणुकादास काशीराम उबाळे

मराठी विभागप्रमुख,

एस. एन. मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा

मार्गदर्शक

प्राचार्यडॉ. आनंद भंडारे

मराठी विभाग,

सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालय, किनवट, जि. नांदेड